# महाराष्ट्र शासन
## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.रासाप्रपक/कृशिप्र-१३२५/सूचना क्र.०६/जाहीर सूचना/SEBC & OBC/मुदतवाढ/२७९७, दिनांक : २८/०८/२०२५

## जाहीर सूचना

**विषय : सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी कृषी अभ्यासक्रमामधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता एसईबीसी आणि ओबीसी उमेदवारांना सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत.**

संदर्भ : सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२५/ प्र.क्र.६८/आरक्षण-५, दिनांक २६/८/२०२५

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतील पदवी अभ्यासक्रमाची सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षातील प्रवेश प्रक्रिया राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात येत आहे. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमदेवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतु सदर उमेदवारांपैकी काही उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करताना येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने संदर्भीय शासन निर्णय दिनांक २६/०८/२०२५ अन्वये एसईबीसी व ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रवेश अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच वरील संदर्भिय शासन निर्णय www.mahacet.org च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

२९/८/२५